जा.क्र.कृ.आ/विप्र.१/राअसुअ-गहूमासू/ ११२ /१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल,
पुणे-४११००५ **दिनांक : २० / ०९ /२०१२.**

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक**
**नाशिक/पुणे/औरंगाबाद/लातूर/नागपूर**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकार**
**नाशिक/धुळे/अहमदनगर/पुणे/सोलापूर/औरंगाबाद/परभणी/नागपूर**

**विषय- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान गहू - सन २०१२-१३ मार्गदर्शक सूचना.**
**संदर्भ- १) केंद्र शासनाचे दि. १ मार्च २००९ च्या मार्गदर्शक सूचना.**
**२) केंद्र शासनाचे दि.१८ एप्रिल २०१२ च्या मार्गदर्शक सूचना.**
**३) शासन निर्णय राअसुअ २०१२/प्र.क्र.५७/राकृवियो कक्ष दि.११ जून २०१२**

केंद्र शासनाने **दि.१ मार्च २००९ चे** पत्रानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाचे कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असुन त्यामध्ये **दि.१८ एप्रिल २०१२** च्या पत्रानुसार त्यामध्ये सुधारणा केल्या आहेत. या दोन्ही मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान संकेतस्थळावर (http://www.nfsm.gov.in) उपलब्ध आहेत. सन २०१२-१३ चे कार्यक्रमास उपरोक्त संदर्भ क्र.३ नुसार राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- गहू राज्यातील नाशिक, धूळे, अहमदनगर, पुणे, सोलापूर, औरंगाबाद, परभणी, नागपूर या जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे.**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान गहू सन २०१२-१३ मध्ये प्रत्येकी १०० हे. चे प्रात्याक्षिक लघुप्रकल्प व प्रत्येकी १०० हे. चे प्रात्याक्षिक विरहीत लघुप्रकल्पामध्ये अशा दोन प्रकारच्या प्रकल्पामध्ये राबवावयाचे आहेत. या प्रकल्पाअंतर्गत उदिष्ट काय राहणार आहे व त्यावरुन जो दृष्य परीणाम अपेक्षित आहे याची नीट मांडणी करुन लघुप्रकल्प तयार करण्यात यावेत.

**प्रकल्प तयार करताना खालील बाबींचे पालन करावे.**

१) जिल्हानिहाय राबवावयाच्या पिक प्रात्यक्षिक विरहीत लघुप्रकल्पांची संख्या व प्रात्यक्षिक लघुप्रकल्पांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

**प्रपत्र-१**

| अ.क्र. | जिल्हा | लघुप्रकल्प संख्या | पिक प्रात्यक्षिके प्रकल्प संख्या | एकुण प्रकल्प संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ४२ | ५ | ४७ |
| २ | धुळे | १६ | २ | १८ |
| ३ | अहमदनगर | ४९ | ९ | ५८ |
| ४ | पुणे | ४७ | ५ | ५२ |
| ५ | सोलापूर | ४२ | ५ | ४७ |
| ६ | औरंगाबाद | २८ | ४ | ३२ |
| ७ | परभणी | २२ | ३.५ | २५.५ |
| ८ | नागपूर | २७ | ४ | ३१ |
| एकूण | | २७३ | ३७.५ | ३१०.५ |

गहू पीकाचे क्षेत्रानुसार तसेच जेथे क्षेत्र वाढीस व उत्पादकता वाढीस वाव आहे याचा विचार करुन तालुकानिहाय/मंडलनिहाय राबवावयाचे लघुप्रकल्पांची संख्या निश्चित करावी व संबंधिताना तसे कळविण्यात यावे व प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

**प्रकल्प क्षेत्राचे पायाभूत सर्वेक्षण**

प्रकल्प अहवाल तयार करताना खालील बाबींचे पायाभूत सर्वेक्षण करण्यात यावे.

अ) निवडलेल्या क्षेत्रातील पीकनिहाय क्षेत्र, पीक पध्दती.

ब) सर्व पीकनिहाय वाणनिहाय क्षेत्र व वाण निहाय उत्पादकता.

क) जमिन आरोग्य पत्रिका नुसार जमीनीचा सामु तसेच उपलब्ध नत्र,स्फुरद, पालाष व सुक्ष्ममुलद्रव्ये .

ड) उपलब्ध सिंचन सुविधा त्यातुन सिंचना खालील क्षेत्र व गहू पिकासाठी उपलब्ध होणारे सिंचन (क्षेत्र).

इ) उपलब्ध ट्रॅक्टर/पॉवर टीलर/बैल जोडी संख्या तसेच औजारे निहाय उपलब्धता.

फ) पीकनिहाय निविष्ठा वापराचे प्रमाण.

ग) उपलब्ध कुशल व अकुशल मनुष्यबळ.

ह) निविष्ठा उपलब्धतेच्या सुविधा तसेच तयार झालेल्या कृषि मालाची पणन व्यवस्था.

उपरोक्त बाबींचा विचार करुन लघुप्रकल्प आराखडा तयार करावा व क्षेत्र व उत्पादकता वाढीचे उद्दिष्ट ठरविण्यात यावेत व त्यानुसार नियोजन करण्यात यावे. उद्दिष्ट ठरविताना गेल्या पाच वर्षामध्ये सर्वात जास्त साध्य झालेली उत्पादकतेपेक्षा ४ टक्के जास्त प्रमाणात लक्ष निर्धारीत करण्यात यावे. प्रकल्प आराखडा तयार करण्यास, यशोगाथा तयार करण्यास शास्त्रज्ञ व अधिकारी भेटीसाठी तसेच संकीर्ण खर्च या बाबींकरीता प्रत्येक प्रकल्पासाठी रु.२७५०/- प्रमाणे उपलब्ध निधी मधून खर्च करण्यात यावा. प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर त्यात कितपत यश आले आहे ते नमुद करुन प्रगति अहवाल तयार करण्यात यावेत. तसेच त्याची विविध बाबींच्या छायाचित्रासहीत यशोगाथा तयार करण्यात यावी.

२) सर्व शेतक-यांचे गट करुन गटामार्फत प्रकल्प राबविण्यात यावेत.

३) सर्वसाधारणपणे १० हेक्टरचे गट तयार करुन प्रत्येक १० हेक्टर मागे गटप्रमुख म्हणुन एका प्रगतिशील शेतक-याची निवड करण्यात यावी म्हणजेच एका प्रकल्पामध्ये सर्वसाधारण १० गट तयार करुन त्याचे प्रत्येकी १ याप्रमाणे १० गटप्रमुखांची निवड करावी.

४) निवड केलेला शेतकरी हा शेतकरी मासीकाचा वर्गणीदार असावा, किंवा त्यास वर्गणीदार करुन घेण्यात यावे.

५) प्रकल्पामध्ये प्रत्येक गटामध्ये राबवावयाच्या बाबींविषयी माहीती सोबत जोडलेल्या प्रपत्र-२ मध्ये देण्यात आलेली आहे.

६) पिक प्रात्यक्षिक प्रकल्पामध्ये १०० हे. क्षेत्रावर समुह स्वरुपात पिक प्रात्यक्षिकांचे आयोजन करावयाचे आहेत. याबाबत मार्गदर्शक सुचनामध्ये सविस्तर नमुद करण्यात आले आहे.

प्रात्यक्षिकांसाठी कृषि विद्यापिठामार्फत विकसित केलेल्या तंत्रज्ञानाच्या शिफारसीचा अंतर्भाव करून पिक प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात यावे. पिक प्रात्यक्षिके साठी पीकाच्या वाणाची निवड करतांना विद्यापीठाने नव्याने वीकसीत केलेल्या वाणांचे प्रमाणित बियाण्यास प्राधान्य द्यावे. १०० हे. चा एक गट याप्रमाणे पिक प्रात्यक्षिके आयोजित करावीत.

सुधारीत पीक प्रात्यक्षिकासाठी लागणा-या निविष्ठासाठी प्रति प्रात्यक्षिक (१ हे.) साठी रू.४६००/- मंजूर आहेत. म्हणजे १०० हे. गटासाठी रक्कम रु.४.६० लाख मंजूर आहेत तसेच १०० हे.च्या एका गटावर प्रात्यक्षिके राबविणेसाठी शास्त्रज्ञ/केंद्र शासनाचे अधिकारी यांच्या भेटीसाठी, मानधन व (ऑईल पेट्रोल घेण्याच्या सोईसह). तसेच शेतकरी प्रर्वतकासाठी प्रति माहे रु.१०००/- प्रमाणे ४ महिन्यासाठी मानधन तसेच ४ महिन्यासाठी येण्याजाण्या साठी खर्च प्रति माहे रु.१०००/- तसेच पीक कापणीसाठीचा खर्च या इत्यादी बाबींवर एकूण २०,०००/-खर्च देय राहील.

## <u>गहू पिक प्रात्यक्षिक अनुदानाचा तपशिल</u>

| अ.क्र. | बाब | रक्कम रू.१०० हे.साठी |
|---|---|---|
| १ | एका हेक्टरसाठी बियाणे, औजारे/स्प्रेअर या निविष्ठासाठी अनुदान प्रति हे.४६०० प्रमाणे राहील. | ४,६०,०००/- |
| २ | पीक कापणी प्रयोग, अहवाल व्यवस्थापन, संकीर्ण व शेतकरी प्रवर्तकासाठी (१०० हे.गटासाठी) २०००/- प्रति महिना ४ महिन्यासाठी शास्त्रज्ञ/राज्य/केंद्रशासनाचे अधिकारी यांचा जाण्यायेण्याचा खर्च, ऑईल, पेट्रोल घेण्याच्या सोईसह, शेतीदिन यासाठी अनुदान | २०,०००/- |
| **१०० हे. क्लस्टरसाठी एकूण देय अनुदान** | | **४,८०,०००/-** |

७) ज्या गावाचा सुपिकता निदशांक नकाशा तयार करण्यात आला आहे अस्या गावा मध्ये सदरचा कायक्रम प्राधान्याने राबवावा, अपवादात्मक परीस्थितीत इतर गावांचा विचार करावा.

<u>गटप्रमुखांच्या सहाय्याने प्रकल्पाअंतर्गत लाभार्थ्यांची निवड करावी.</u>

१) प्रकल्पाच्या यशस्वीरित्या अंमलबजावणीसाठी निविष्ठा वेळेवर उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे त्यासाठी गटप्रमुखांच्या सहाय्याने राबवावयाच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे.तसेच त्याचे वेळापत्रकही तयार करण्यात यावे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ/महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ/मार्कफेड यांचे क्षेत्रीय अधिका-यांशी संपर्क साधुन निविष्ठांचा पुरवठा कोणत्या ठिकाणी करावयाचा आहे याची माहीती द्यावी व निविष्ठा पुरवठयाचे नियोजन करण्यात यावे.

२) सुधारीत कृषि औजारांची उपलब्धता व सेवा उपलब्ध होण्यासाठी स्वयंरोजगार सेवा पुरवठादार गट तयार करण्यात यावे व स्थानिक गरजे नुसार उपरोक्त दर्शविलेल्या औजारांचा अनुदानावर गटास/वैयक्तिक लार्भार्थ्यास पुरवठा करण्यात यावा.

३) बियाणे वाटप, सुक्ष्ममुलद्रव्ये, यांत्रिकीकरण, पंपसेट वितरण, शेतकरी शेतीशाळा इ.कार्यक्रम राबविण्यासाठी सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना सोबत देण्यात आलेल्या आहेत. त्याचा अवलंब करावा.

४) प्रत्येक प्रकल्पामध्ये लाभार्थीची माहिती, निविष्ठा पुरवठा, प्रशिक्षण या बाबींची नोंद एका नोंदवहीमध्ये ठेवण्यात यावी. तसेच एक भेटीची नोंदवही ठेवून वरिष्ठ अधिकारी, कृषि विद्यापीठ शास्त्रज्ञ यांच्या भेटीच्या नोंदी ठेवाव्यात व त्यांच्या दिनांकीत स्वाक्षर्या घ्याव्यात.

५) शेतकरी मासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी शेतक-यांना उदयुक्त करण्यात यावे जेणेकरून अद्यावत तंत्रज्ञानाची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होईल.

**प्रकल्पाबाहेर राबवावयचा बाबनिहाय जिल्हानिहाय कार्यक्रम <u>प्रपत्र-३</u> मध्ये देण्यात आला आहे. प्रकल्पाबाहेर राबवावयाचे दिलेल्या जिल्हानिहाय उद्दिष्टानुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुक्याच्या क्षेत्रानुसार कार्यक्रमाचे नियोजन करावे व त्यानुसार कार्यक्रम राबविण्याबात सर्व संबंधीतांना कळविण्यात यावे. <u>प्रपत्र -४</u> मध्ये प्रकल्पाअंतर्गत व प्रकल्पाबाहेर एकूण कार्यक्रम देण्यात आलेला आहे.**

**प्रकल्पाअंतर्गत व प्रकल्पाबाहेर कार्यक्रम राबवितांना अनुसूचित जातींना १६ टक्के, अनुसूचित जमातींना ८ टक्के व महिला लाभार्थ्यांना ३० टक्के प्रमाणे लाभ देण्यात यावा.**

<u>मासिक प्रगती अहवाल सादर करतांना उपरोक्त सवर्गनिहाय बाबनिहाय खर्च दर्शविण्यात यावा.</u>

**<u>लाभार्थिंची माहिती संकेतस्थळावर भरणे</u>**

**१.** राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत -भात, गहु, कडधान्य कार्यक्रमामध्ये लाभार्थ्यांना निरनिराळ्या बाबीचा लाभ देण्यात येतो याविषयाची तालुकानिहाय माहिती संकेतस्थळावर_भरण्याविषयी केंद्र शासनाचे निर्देश आहे. याकरीता केंद्र शासनाने **http://www.nfsm.gov.in** या संकेतस्थळावर माहिती भरण्याची व्यवस्था केलेली आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कार्यक्रमामध्ये समाविष्ठ असलेल्या जिल्ह्यामधील सर्व तालुका कृषि अधिकारी यांनी निरनिराळ्या घटकांअंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची माहिती ऑनलाईन भरावयाची आहे. यासाठी उप विभागीय कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चीत करण्यात आली आहे.

**२.** संकेतस्थळावर माहिती भरणे अनिवार्य असल्यामुळे अपूर्ण माहिती असल्यास पुढील निधीची तरतुद केली जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

**३.** राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाअंतर्गत गावनिहाय वाटप केलेल्या निविष्ठा, प्रात्यक्षिके व इतर दिलेले लाभ या बाबतची लाभार्थिंची यादी ग्रामपंचायत कडे पाठवुन सदरील माहिती ग्रामसभेत सादर करावी.

**४.** सोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी व अभियान कार्यक्रम यशस्वीपणे राबवावा.

**सोबत :- वरीलप्रमाणे**

-स्वाक्षरीत-

**कृषि संचालक**

**(विस्तार व प्रशिक्षण)**

**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०५**

**प्रत-**

**१)** मा. प्रधान सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

**२)** मा.व्सवस्थापक संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, राजन हाऊस, तिसरामजला, प्रभादेवी, मुंबई-६५

**३)** मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाण महामंडळ मर्यादीत, महाबीज भवन, कृषि नगर, अकोला-४४४१०४

## <u>राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, गहू पिक मार्गदर्शक सुचना सन २०१२-१३</u>

**प्रस्तावना**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना २००७-०८ मध्ये सुरू करण्यात आली आहे. या अभियानाअंतर्गत राज्यात तृणधान्यामधील भात व गहू पिकांची निवड करण्यात आली असुन. १२ व्या पंचवार्षिक योजनेत समावेश करण्यात आले आहे. गहू पिकाचे देश पातळीवरील उत्पादन वाढविण्याचे लक्ष निश्चित करण्यात आले आहे.

या अभियानाअंतर्गत राज्यातील नाशिक, धुळे, अहमदनगर, पुणे, सोलापूर, औरंगाबाद, परभणी, नागपूर या आठ जिल्ह्यांची गहू पिकासाठी निवड करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानातील निविष्ठा, औजारे व पिक प्रात्यक्षिके इत्यादी बाबींचे जिल्हा अन्न सुरक्षा अभियान कार्यकारी समितीच्या मान्यतेने करण्यात यावे.

### <u>पिक प्रात्यक्षिके :</u>

१) पीक प्रात्यक्षिकचे आयोजन १०० हेक्टर क्षेत्राचे गटावर आयोजित करण्यात यावे. प्रात्यक्षिकांच्या गटांचे जिल्हानिहाय लक्षांक सोबत जोडलेल्या तक्त्यात देण्यात आले आहे.

२) एका हेक्टर क्षेत्राच्या बियाणे, औजारे/स्पेअर या नविष्ठासाठी व इतर बाबींसाठी रु.४,८००/- प्रती प्रात्याक्षिक अनुदान उपलब्ध आहे.

३) प्रात्याक्षिकांमध्ये कोणत्या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा हे ठरविण्यासाठी जि.अ.कृ.अ. यांच्या स्तरावर समिती स्थापन करण्यात यावी. या समितीमध्ये उप विभागीय कृषि अधिकारी व कृषि विज्ञापीठ तंज्ञाचा समावेश करावा. त्यानुसार कोणत्या निविष्ठांचा वापर करावा हे ठरविण्यात यावे.

४) निवड केलेला शेतकरी हा शेतकरी मासीकाचा वगणीदार असावा, किंवा त्यास वगणीदार करुन घेण्यात यावे.

५) एका लाभार्थी शेतक-यांस एकच प्रात्याक्षिक देण्यात यावे.

६) प्रात्यक्षिक आयोजनाबाबत विभागाकडून देण्यात आलेले उद्दीष्ट लक्षात घेऊन आवश्यक असलेल्या निविष्ठा जिल्हास्तरीय समितीमध्ये अनुदान मर्यादेपर्यंत अंतिम करण्यात याव्यात.

७) लाभार्थी शेतकर्यांचीनिवड मंडळ कृषि अधिकारी यांनी गट प्रमुखाच्या मदतीने करवी.

८) शेतकरी निवड केल्यानंतर प्रात्यक्षिकासाठी आवश्यक असणार्या निविष्ठांची एकूण मागणी तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडे मंकृअ यांचे मार्फत नोंदविण्यात यावी. ताकृअ यांनी जिअकृअ यांचेकडे निविष्ठा मागणी नोंदवावी. जिल्हयातील निविष्ठांची एकत्रित मागणी विभागीय कृषि सहसंचालक संस्थेकडे नोंदविण्यात यावी. त्यासाठी पुरवठादार संस्थेस ठिकाण, कालावधी बाबतचा सविस्तर तपशिल कळविण्यात यावा.

९) प्रात्याक्षिक पिकाचा उत्पादकता लक्षांक हा प्रात्यक्षिकासाठी निवड करण्यात आलेल्या वाणाच्या उत्पादन क्षमतेएवढा निश्चित करावा.

१०) प्रात्यक्षिक प्लॉटला नियमीत भेटी देण्यात याव्यात. भेटीमध्ये केलेल्या मार्गदर्शनाची नोंद कृषि सहाय्यक यांनी क्षेत्रिय स्तरावरील नोंदपुस्तिकेत करावी.

११) प्रात्यक्षिकासाठीच्या निविष्ठा वेळेपूर्वी लाभार्थीस उपलब्ध होण्यासाठी आवश्यक ते नियोजन मंडळ कृषि अधिकारी यांनी करावे.

१२) प्रात्यक्षिकासाठी ५ वर्षाचे आतील अधिसूचित केलेले सुधारीत वाण घेण्यात यावेत.

१३) सदर प्रात्यक्षिके शक्यतो हमरस्त्यालगत असावीत. तसेच सदर प्रात्यक्षिक फलक रस्त्याच्या कडेला प्लॉटशेजारी लावण्यात यावा व त्यावर परिसरातील शेतक-यांच्या भेटी घडवून आणाव्यात.

१४) प्रात्यक्षिकांचे निरिक्षण कृषि पर्यवेक्षक यांनी करावे.

१५) प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन उपविभागीय कृषि अधिकारी यांनी करावे.

१६) लाभार्थ्यांची यादी नोटीसबोर्ड, कृषि विभागाच्या संकेतस्थळावर जाहीर करावी. तसेच यास प्रसिध्दी देण्यात यावी.

## गहू पिक प्रात्यक्षिक अनुदानाचा तपशिल

| अ.क्र. | बाब | रक्कम रू.१०० हे.साठी |
|---|---|---|
| १ | एका हेक्टरसाठी बियाणे, औजारे/स्प्रेअर या निविष्ठासाठी अनुदान प्रति हे.४६०० प्रमाणे राहील. | ४,६०,०००/- |
| २ | पीक कापणी प्रयोग,अहवाल व्यवस्थापन,संकीर्ण व शेतकरी प्रवर्तकासाठी (१०० हे.गटासाठी) २०००/- प्रति महिना ४महिन्यासाठी शास्त्रज्ञ /राज्य/केंद्रशासनाचे अधिकारी यांचा जाण्यायेण्याचा खर्च,ऑईल,पेट्रोल घेण्याच्या सोइसह, शेतीदिन यासाठी अनुदान | २०,०००/- |
| **१०० हे. क्लस्टरसाठी एकूण देय अनुदान** | | **४,८०,०००/-** |

**प्रमाणित बियाणे वितरण (वाण बदल)**

पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी बियाणे या मूलभूत निविष्ठेवर भर देणे महत्वाचे आहे. सुधारीत गहू बियाणे, वाटप, अधिक उत्पादन देणा-या गहू बियाण्यांच्या मिनीकिटसचे वाटप इत्यादी बाबी या कार्यक्रमाअंतर्गत राबविणे आवश्यक आहे.

१) अभियानांतर्गत उत्पादन वाढविण्याच्या हेतुने बियाणे बदल अभिप्रेत असून गहू वाणाचा अधिक उत्पादन देणा-या व मागील १० वर्षात प्रसारीत झालेल्या वाणाचे दर्जेदार प्रमाणित बियाणांच्या खरेदीसाठी रक्कम रू.५००/- प्रतीक्विंटल किंवा किमंतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल त्या दराने अनुदान देय राहील.

२) प्रत्येक लघु प्रकल्पाच्या गटामध्ये १००क्वि. बियाणे, मंडळ कृषि अधिकारी यांनी निवड केलेल्या शेतक-यांना महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ यांनी त्यांचे वितरकामार्फत प्रती क्वि. रु.५००/- दर कमी करुन वाटप करावयाचे आहेत. तसेच प्रकल्पाबाहेरील उर्वरीत बियाणे देखील त्यांचे वितरकामार्फत प्रती क्वि. रु.५००/- दर कमी करुन वाटप करावयाचे आहे.

**प्रकल्पाअंर्तगत व प्रकल्पाबाहेरील सर्व बियाणे वाटप करतांना महाबीज मार्फत त्यांचे वितरकांव्दारा अनुदानावर बियाणे वितरीत करण्यात येईल. तसेच कृषि विज्ञापीठाने उत्पादीत केलेल्या १० वर्षाचे आतील अधिसुचित वाणांचे सत्यतादशक/प्रमाणित बियाण्यांसाठी सदर अनुदान देय राहील. बियाणे वाटपाबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात येतील.**

**सूक्ष्ममूलद्रव्यांचा वापरः-**

१) प्रत्येक लघु प्रकल्पाच्या गटामध्ये ४६ हे. क्षेत्रावर सुक्ष्ममुलद्रव्य वाटप करावयाचे आहे.

२) सूक्ष्ममुलद्रव्याचा वापर पेरणीपूर्वी करण्यात यावा.

३) शेतक-यांना जास्तीत जास्त २ हेक्टर क्षेत्रासाठी निर्धीरीत केलेल्या पिकास मदत देण्यात येईल.

४) गहू या पिकासाठी शेतक-यांना सूक्ष्ममूलद्रव्यासाठी रक्कम रुपये ५००/- प्रति हेक्टर किंवा किमंतीच्या ५० टक्के यापैंकी जी कमी असेल ती मदत मिळेल.

५) गहू पिकाची उत्पादकता वाढविणेसाठी झिंक या सूक्ष्ममूलद्रव्यांची आवश्यकता दिसून आलेली आहे. त्यासाठी झिंक हे सूक्ष्ममूलद्रव्य सरळ खताच्या स्वरूपात प्रति हेक्टर २५ किलो याप्रमाणात वापरण्यात यावे. सदर सूक्ष्ममूलद्रव्य पुरवठा बाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सविस्तर तालुकानिहाय पुरवठा आदेश महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ/मार्कफेड यांना देण्यात यावे.

६) मातीपरीक्षणानुसार/कृषि विद्यापीठांच्या शिफारशीनुसार इतर सूक्ष्ममुलद्रव्याची आवश्यकता असल्यास त्याचा वापर करण्यास हरकत नाही.

७) सुक्ष्म मुलद्रव्य पुरवठा करण्यात आलेल्या क्षेत्राची कृषि सहाय्यक यांनी निरिक्षण घेऊन निरिक्षण नोंदवहित नोंदवावी. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी मुल्यांकन अहवाल सादर करावा.

**<u>गहू पिकात फॉस्पो-जिप्समचा वापरः-</u>**

१) प्रत्येक लघु प्रकल्पाच्या गटामध्ये १०० हे. क्षेत्रावर फॉस्पो-जिप्सम वाटप करावयाचे आहे.

२) फॉस्पो-जिप्समचे किंमतीच्या ५० टक्के रक्कम अधिक संपूर्ण वाहतूक खर्च किंवा प्रति हेक्टर रू.५००/- यापैकी जे कमी असेल ती मदत लाभार्थीस देय आहे.

३) लाभार्थीचे क्षेत्र ज्या कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येत असेल त्या कृषि विद्यापीठाने गहू विकासाठी जी फॉस्पो-जिप्समची मात्रा निश्चित केलेले असेल व वापरण्याची पध्दत सूचविलेली असेल त्या प्रमाणात फॉस्पो-जिप्समचा वापर करण्यात यावा अथवा केंद्र शासनाच्या गहू उत्पादन संबंधी प्रशिक्षण नियम-पुस्तिकेत नमूद केलेल्या मात्रेनुसार (१२० किलो प्रति हेक्टर) फॉस्पो-जिप्समचा वापर करावा.

४) ज्या शेतकर्यांच्याजमिनी आम्लधर्मी किंवा ज्या जमिनींचा सामू नुसार मर्यादेपेक्षा जास्त आहे अशांना मदत देय राहील.

५) ज्या शेतकर्यांनाफॉस्पो-जिप्समच्या वापरासाठी मदत दिल्यानंतर त्याला त्याच जमिनीकरीता दुसर्या वर्षी पुन्हा मदत देता येणार नाही.

६) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून त्यांचे तालुक्यात तालुकानिहाय फॉस्पो-जिप्समच्या आवश्यकतेची आकडेवारी व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र कृषि विकास महामंडळ मर्यादीत मुंबई/मार्कफेड यांनी प्राप्त करून त्यांनी सूचविलेप्रमाणे तालुका ठिकाणापर्यंत पुरवठा करण्यात यावा.

७) फॉस्पो-जिप्समचे दरपत्रक गु.निविष्ठाशाखेमार्फत पारीत करण्यात आले आहे. त्या दरानुसार व ठरवुन दिलेल्या कार्यपद्धतीनुसार फॉस्पो-जिप्समचा पुरवठा करण्यात यावा.

**<u>गहू पीक संरक्षणासाठी रासायनिक औषधे जैविक कीटकनाशके व तणनाशके पुरवठा:-</u>**

१) गहू पिकातील एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी तथा तणनियंत्रण औषधासाठी रक्कम रुपये ५००/- प्रति हेक्टर किंवा ५० टक्के या पैकी जे कमी असेल ती आर्थिक मदत देय राहील.

२) या बाबी अंतर्गत जैविक व रासायनिक कीटकनाशके यांचा वापर करता येईल.

३) प्रति शेतकरी २ हेक्टर मर्यादेपर्यत सदर बाबीचे अनुदान देय राहील.

गहू पिकावरील कीड व रोगांची लागण होताच मंडळ कृषि अधिकारी यांचेकडे लेखी कळविण्याची जबाबदारी कृषि पर्यवेक्षक यांची राहिल. मंकृअ यांनी खात्याच्या मार्गदर्शक सुचनानुसार औषधाची मागणी ताकृअ यांचेकडे कळवावी. सदर मागणी ताकृअ यांनी जिअकृअ यांचेकडे व जिअकृअ यांनी विभागीय कृषि सह संचालक यांच्या मान्यतेने पुरवठादार संस्थेकडे मागणी आदेश नोंदविण्यात यावेत. गु. निविष्ठा शाखेमार्फत याचे दरपत्रक व खरेदी पद्धतीबाबत परीपत्रक निर्गमित केले आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

**<u>यांत्रिकीकरण (औजारांचा वापर)</u>**

१. **<u>फवारणी यंत्र (नॅपसॅक स्प्रेअर) -</u>** प्रत्येक लघु प्रकल्पाच्या गटामध्ये फवारणी यंत्र १० नग वाटप करावयाचे आहेत. या यंत्रासाठी प्रत्येकी रक्कम रुपये ३०००/- अथवा किंमतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते अनुदान देय राहील.

२. **<u>पाभर -</u>** प्रत्येक लघु प्रकल्पाच्या गटामध्ये पाभर ३ नग वाटप करावयाचे आहेत. या यंत्रासाठी प्रत्येकी रक्कम रूपये १५०००/- अथवा किंमतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते अनुदान देय राहील.

३. **<u>रोटाव्हेटर -</u>** प्रत्येक लघु प्रकल्पाच्या गटामध्ये रोटाव्हेटर १ नग वाटप करावयाचे आहेत. या यंत्रासाठी प्रत्येकी रक्कम रूपये ३००००/- अथवा किंमतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते अनुदान देय राहील.

४. **<u>पंपसेट वितरण -</u>**

**१)** प्रत्येक लघु प्रकल्पाच्या गटामध्ये पंपसेट (डिझेल/पेट्रोकेरोसीन/विद्युत) १० नग वाटप करावयाचे आहेत.

**२)** ५ एच.पी. पर्यंत क्षमतेचे पंपसेट डार्क झोन मधिल भागात ज्याठिकाणी वेगवेगळ्या योजनेतून शेततळी घेण्यात आलेली आहे त्या भागात वितरीत करण्यात यावे.

**३)** डार्क किंवा ब्राऊन झोनमध्ये समावेश नसलेल्या जिल्हयातील/तालुक्यासाठी पंपसेट देय राहील. याबाबत केंद्रीय भुजल सर्वेक्षण समितीने सदर क्षेत्र डार्क किंवा ब्राऊन झोनमध्ये मध्ये येत नसल्याबाबत प्रमाणीत केलेले असावे.

४) डिझेल किंवा इलेक्ट्रीकल पंपसेट (१० एच पी पर्यंत) ISI १०८०४ (१९९४) या मानकाचे असणे बंधनकारक आहे.
५) गहू पिकासाठी पंपसेटसाठी लाभार्थी निवडीची जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहिल. लाभार्थी निवड करताना ज्या शेतकर्यांनी यापुर्वी शेततळ्याचा विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनेत लाभ घेतलेला आहे अशा लाभार्थीची प्राधान्याने पंप वितरणासाठी निवड करण्यात यावी. असा लाभार्थी नसल्यास इतर शेतकऱ्यांच्याकडे खात्रीचा पाणीपुरवठा स्त्रोत असल्याची खातरजमा करुन निवड करण्यात यावी. तसेच तालुक्याची एकत्रित मागणी जिअकृअ यांचेकडे नोंदविण्यात यावी. जिअकृअ यांनी खरेदी संदर्भात जिल्हास्तरीय कमिटीमध्ये खरेदी बाबतचा निर्णय अंतिम करण्यात यावा.
६) पंपसेट ही बाब राजीवगांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेशी एकात्मिकरित्या राबविण्यात यावी.
७) पंपसेटसाठी प्रत्येकी रक्कम रुपये १०,०००/- अथवा किमतीच्या ५० टक्के यापैकी जे कमी असेल ते अनुदान म्हणून देय राहिल.

**<u>औजारे वितरण पध्दत :-</u>**

१) यांत्रिकीकरणाचा लाभ देताना अनुसूचित जातींना १६ टक्के, अनुसूचित जमातींना ८ टक्के व महिला लाभार्थ्यांना ३० टक्के प्रमाणे लाभ देण्यात यावा. महिलांचे स्वयंसेवीसंघ यांना प्रथम प्राधान्याने लाभ देण्यात यावा. यांना लाभ देऊन उर्वरित यंत्रे, अत्यल्प भूधारक, अल्पभूधारक, छोटे शेतकरी, मोठे शेतकरी अशा क्रमाणे वाटपाची कार्यपध्दती ठेवावी. तसेच ज्या ठिकाणि अपंग शेतकरी असेल व योजनेतील बाबीसाठी त्याला अनुदान देय असेल तर प्राधान्याने अशा लाभार्थ्याची निवड करण्यात यावी.
२) सर्व औजारांचे तांत्रिक निकष संबंधित उत्पादक संस्थेकडून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहिल. तसेच सदरचे निकष ताकृअ यांना कळविण्याची जबाबदारी जिअकअ यांची राहील.
३) शासकीय पुरवठादार संस्थानी पुरवठा केल्यानंतर सर्व औजारांचा पुरवठा संस्थेच्या तांत्रिक मानांकाप्रमाणे असल्या बाबतची तपासणी व खातरजमा करणेबाबत तालुका कृषि अधिकारी यांची जबाबदारी राहील.
४) तालुक्याच्या चिकीत्सालयाच्या ठिकाणी अथवा तालुका बिज गुणन केंद्र येथे औजारे प्राप्त करुन लाभार्थ्यांना औजारे वाटप करण्यात यावे. पोहोच घेऊन संग्रही ठेवावी.आवश्यक त्या नोंदी नोंदवहित घेण्यात याव्यात.
५) तांत्रिक तपासणीमध्ये औजारांचा जो लॉट अपात्र ठरेल तो मुळ संस्थेस त्यांच्या खर्चाने परत करावा तसे बंधन त्यांना पुरवठा आदेश देताना त्यामध्ये नमुद करावे.
६) औजारांचे साठा रजिस्टर ठेवून तालुका कृषि अधिकारी यांनी लेखा पध्दती प्रमाणे नोंदी घेण्यात याव्यात.

**<u>शेतकरी प्रशिक्षण :-</u>**

अधिक उत्पादन व उत्पादकता घेणेसाठी शेतक-यांना प्रत्यक्ष त्यांच्या शेतावर अद्ययावत तांत्रिक माहिती पुरविणे, शेतीशास्त्राचे उत्तम दर्जाचे तंत्रज्ञान देणे, हा शेतकरी प्रशिक्षण वर्गाचा मुख्य हेतू आहे. शेतकरी प्रशिक्षण हे शेतकरी शेतीशाळा धर्तीवर राबविण्याचे आहेत. त्याची पुढीलप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१) प्रत्येक लघु प्रकल्पाच्या गटामध्ये १ शेतकरी शेतीशाळाच्या धर्तीवर प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात यावा. सदरचे काम टि.ओ.ऐफ अतंर्गत प्रशिक्षीत कर्मचा-यांनाच शक्यतो देण्यात यावे किंवा त्यांच्या मार्गदर्शनाखाली घ्यावे.
२) शेतकरी प्रशिक्षण वर्ग घेण्याची ठिकाणे जिल्हास्तरीय समितीमध्ये निश्चित करण्यात यावी.
३) सदर शेतकरी प्रशिक्षण वर्ग हे पिक पध्दतीवर आधारीत असावेत व त्यामध्ये हंगामातील सर्व पिकांचा समावेश प्रशिक्षण वर्गात असावा.
४) एक प्रशिक्षण वर्ग हा एकुण चार सत्रामध्ये प्रत्येकी ३० शेतक-यांच्या समुहासाठी आयोजीत करण्यात यावा. एका सत्रासाठी रक्कम रूपये ३५००/- आर्थिक तरतूद राहिल.
५) संपुर्ण चार सत्राच्या प्रशिक्षण वर्गासाठी रक्कम रु. १४०००/- अनुदान देय राहील.

**<u>त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे</u>**

**<u>शेतकरी प्रशिक्षण तपशिल</u>**

| अ.क्र. | तपशिल/बाब | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | प्रथम सत्र रब्बी हंगामाच्या सुरवातीस | ३५०० |
| २ | व्दितीय व तृतीय सत्र रब्बी हंगामाच्या कालावधीत | ७००० |
| ३ | चौथे सत्र रब्बी हंगामाच्या पिक कापनीनंतर | ३५०० |
| एकूण खर्च | | **१४,०००** |

**<u>शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे बाबनिहाय सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे राहील :-</u>**

| अ.क्र. | तपशिल/बाब | दर | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षकाचे मानधन | ५००/- प्रति सत्र एकूण ४ सत्र | २०००/- |
| २ | प्रशिक्षण साहित्य व लेकन साहित्य | ५००/- प्रति सत्र एकूण ४ सत्र | २०००/- |
| ३ | चहा/नाष्टा प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षक व सहकर्मचारी | ५०/- प्रति सत्र एकूण ३५ व्यक्ती | ७००० |
| ४ | संकीर्ण, पेट्रोल, डिझेल व शेतक-यांचा प्रवास खर्च | ७५०/- प्रति सत्र एकूण ४ सत्र | ३००० |
| एकूण खर्च | | | **१४,०००** |

**६)** राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानामध्ये समाविष्ट असणा-या तालुक्यासाठी पीकाखालील क्षेत्राप्रमाणे शेतकरी प्रशिक्षण वर्गाची संख्या राहिल. कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्र, केंद्र शासनाच्या संस्था येथील दोन कृषि तंज्ञ प्रत्येक शेतकरी प्रशिक्षण वर्गात मार्गदर्शन करण्यासाठी असावेत.

**७)** प्रत्येक शेतकरी प्रशिक्षण वर्गात शेतक-यांची संख्या ३० च्या मर्यादेपर्यंत राहील. प्रत्येक शेतकरी प्रशिक्षण कृषि तज्ञांच्या सोईच्या वेळेनुसार ४ ते ५ तासाची असेल.

मार्गदर्शनासाठी बोलविण्यात आलेल्या तज्ञांचे मानधन, प्रशिक्षणासाठी लागणारे साहित्य व माहीती पुस्तिका तसेच प्रशिक्षणार्थीसाठी लागणारे अल्पोहार इ. खर्च करण्यात यावा.

विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे आधिन राहून शेतक-यांच्ये शेतकरी प्रशिक्षण आयोजित करण्यात यावेत. तज्ञ प्रशिक्षकांचे प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थीमार्फतच शेतक-यांच्या शेतकरी प्रशिक्षण आयोजीत केल्या जातील, हे कटाक्षाने पाहावे.

शेतक-यांना प्रत्यक्ष गहू क्षेत्रावर पिकाच्या संपूर्ण हंगामात पीकाच्या वाढीच्या प्रमुख अवस्थेत टीओएफच्या अभ्यास क्रमानुसार प्रशिक्षण देण्यात यावे. यापूर्वी टी.ओ.एफ. व्दारे प्रशिक्षित झालेले कर्मचारी/शेतकरी/इतर संस्थांचे प्रतिनिधी हे प्रशिक्षकाचे काम करतील. प्रत्येक शेतकरी प्रशिक्षणासाठी असे दोन प्रशिक्षक असतील. प्रत्येक शेतकरी प्रशिक्षण ३० शेतक-यांना प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षणात सहभागी शेतक-यांपैकी सलग १०० हेक्टर क्षेत्र असणा-या गटात प्रात्यक्षिक आयोजित करावे. हे प्रशिक्षण शेतक-यांचा प्रत्यक्ष सहभाग व कृतिव्दारे अनुभव या तत्वावर आधारीत असावे. शेतकरी प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम हा हंगामानुसार व स्थानिक गरजेनुरुप असावा.

**८) <u>आकस्मिक खर्च</u>**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कार्यक्रम गतीमान होण्यासाठी जिल्हयाला इंधन वाहनाची देखभाल व दुरूस्ती व प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा यासाठी (तांत्रिक सल्लागार व तंत्रसहाय्यक यांचे मानधनासह संकीर्ण खर्च) रु.६.३८ लाख अर्थ सहाय्य देय राहील. प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा बाबीअंतर्गत प्रत्येक जिल्हयासाठी जिल्हा सल्लागार व तंत्रसहाय्यक यांना मान्यता असून यापुर्वी दिलेल्या सुचनानुसार मानधन दिलेल्या मापदंडानुसार खर्च करण्यात यावा.

**<u>विशेष सुचना :-</u>**

१) योजनेतील मंजूर लक्षांकास अनुसरून आयुक्तालय स्तरावरून बाबनिहाय दिलेल्या लक्षांकानुसार दिलेल्या योजनेची अंमलबजावणी करण्याची आहे. आयुक्तालयाच्या परवानगीशिवाय कोणत्याही परिस्थितीत क्षेत्रिय स्तरावरून बाबबदल करणेत येऊ नये.

२) या योजनेतील समाविष्ट घटकाच्या अंमलबजावणीस आवश्यक असणा-या कृषि निविष्ठांची आवश्यकता जिल्हास्तरावर अंतिम करणेत यावी. सदरच्या निविष्ठा मागणीस विभागीय कृषि सह संचालक यांची पुर्वमान्यता

घ्यावी. विभागीय कृषि सह संचालक यांच्या विभागीय कृषि सह संचालक कार्यालयाकडे आपला प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तीन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसापर्यंत विभागीय कृषि सह संचालक यांची सदर निविष्ठा मागणीस मान्यता न मिळाल्यास सदर प्रस्तावास मान्यता आहे असे समजून जिल्हास्तरावरून मागणी आदेश नोंदविण्याची कार्यवाही करावी.

३) या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये शेतकरी लाभार्थीचा हिस्सा याचा समावेश असून सदर हिस्सा क्षेत्रिय स्तरावर क्षेत्रिय कर्मचा-यामार्फत शेतक-यांकडून जमा केला जातो. हा हिस्सा प्राप्त होताच सत्वर संबधीत पुरवठादार संस्थेकडे भरणा करणेसाठी कार्यालयात जमा करावा. शेतकरी वाटा कार्यालयात जमा करण्यास दिरंगाई हा अपहार समजून या बाबत विलंब आढळल्यास कार्यालय प्रमुखाने संबधीताबाबत प्रशासकीय कार्यवाही करावी अन्यथा कार्यालय प्रमुखास जबाबदार धरणेत येऊन या बाबत त्यांचे विरूध्द आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**<u>योजनेचे सनियंत्रण व मूल्यमापन</u> :-**

**<u>विविध स्तरावर रवर्चाच्या तपासणीची टक्केवारी खालील प्रमाणे राहिल.</u>**

| अ.क्र. | स्तर | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | विभागीय कृषि सह संचालक | १ |
| २ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | २ |
| ४ | उप विभागीय कृषि अधिकारी | ५ |
| ५ | तालुका कृषि अधिकारी | १० |
| ६ | मंडल कृषि अधिकारी | १५ |
| ७ | कृषि पर्यवेक्षक | ५० |
| ८ | कृषि सहाय्यक | १०० |

विभागीय कृषि सहसंचालक यांनी प्रत्येक महिन्यात किमान एका प्रकल्पाला भेट दयावी. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी ३ प्रकल्पाला व कृषि उपसंचालक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील ५०% प्रकल्पांना भेटी दयाव्यात व निविष्ठा पुरवठा व इतर कार्यक्रमांचा आढावा घ्यावा. भेट नोंदवहीमध्ये तशी नोंद करावी व शेर्यामध्येसूचना लिहाव्यात.

प्रत्येक जिल्हयाने व विभागाने दरमहा ५ तारखेपर्यंत बाबनिहाय मासिक प्रगती अहवाल विहित प्रपत्रात आयुक्तालयास सादर करावा.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान सन २०१२-१३ मध्ये ज्या जिल्हयामध्ये राबविण्यात येत आहे या अभियाना अंतर्गत राबविण्यात आलेल्या गहू पिक कार्यक्रमाच्या बाबी तृणधान्य विकास कार्यक्रमा अंतर्गत राबविण्यात येऊ नये. या बाबत संबधीत जिल्ह्याने व विभागाने दक्षता घ्यावी.

सन २०१२-१३ च्या हंगामासाठी हार्दिक शुभेच्छा॥

-स्वाक्षरीत-

**कृषि संचालक**

**(विस्तार व प्रशिक्षण)**

**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे-५**

**प्रपत्र -२**

**प्रात्यक्षिक विरहित प्रकल्प निहाय राबवावयाचा कार्यक्रम**

प्रकल्प क्षेत्र १०० हेक्टर रू. हजारात

| अ.क्र. | बाब | अर्थसहाय्याचा दर | परिमाण | मंजूर कार्यक्रम १२-१३ | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | भौतीक | आर्थिक |
| १ | सुधारीत बियाणे वाटप | रु.५००/- प्रति क्विंटल | क्विंटल | १०० | ५०.०० |
| २ | सूक्ष्म मूलद्रव्ये वाटपसाठी अर्थसहाय्य | रु.५००/- प्रति हेक्टर | हे. | ४६ | २२.९१ |
| ३ | फॅास्पो जिप्सम वाटपसाठी अर्थसहाय्य | रु.५००/- प्रति हेक्टर | हे. | १०० | ५०.०० |
| ४ | पीक संरक्षक औषधे | रू.५००/- | हे. | ५० | २५.०० |
| ५ | नॅपसॅक स्प्रेअर (फवारणी यंत्र) | रु.३०००/- प्रति यंत्र | संख्या | १० | ३०.०० |
| ६ | पाभर | रू.१५०००/- | संख्या | ३ | ४५.०० |
| ७ | रोटाव्हेटर | रू.३००००/- प्रति यंत्र | संख्या | १ | ३०.०० |
| ८ | पंपसेट | रु.१००००/- प्रति संच | संख्या | १० | १००.०० |
| ९ | शेतकरी प्रशिक्षण | रु.१४०००/- प्रति शेतीशाळा | संख्या | १ | १४.०० |
| १० | संकीर्ण | | | | २.७५ |
| | **एकूण** | | | | **३६९.६६** |